महाराष्ट्र शासन

GOVERNMENT OF MAHARASHTRA

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बारामती, पुणे.

# GOVERNMENT AYURVED COLLEGE & HOSPITAL, BARAMATI, PUNE.

Email ID – gacbaramati@gmail.com / gahbaramati@gmail.com Contact No. ९०७५४२३२४८.

जा.क्र.शाआमबा/आजादी/अमृत महोत्सव/२०२२, /१३२ दि.१२.०५.२०२२.

प्रति,
मा.संचालक,
आयुष संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बारामती, पुणे.
आजादी का अमृत महोत्सव अर्थात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत.

संदर्भ :- १) संचालक, आयुष संचालनालय, महा.राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचा ई-मेल दि.११-०५-२०२२.
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शाआरुबा/आजादी/अमृत महोत्सव/२०२१-२३/५८, दिनांक २५-०३-२०२२.

मा.महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भित पत्रानुसार आजादी का अमृत महोत्सव अर्थात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत या महाविद्यालय/रुग्णालयाबाबतची माहिती विहित नमुन्यात खालील प्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

अ) डिसेंबर-२०२१ ते मे-२०२२ पर्यतचे कालावधीत घेण्यांत आलेले कार्यक्रम.

| अ.क्र. | दिनांक | आयोजित केलेले कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | ०९-०३-२०२२ | महिला रुग्णालय, बारामती, पुणे येथील रुग्णांना स्वस्थवृत विभागामार्फत उन्हाळयातील दिवसांमध्ये आयुर्वेदाच्या अनुषंगाने दिनचर्येबाबत माहिती/व्याख्यान देण्यांत आले. वैद्य प्रफुल्ल कोटलवार, सहा.प्राध्यापक, स्वस्थवृत्त विभाग, यांना सदरचे व्याख्यान दिले आहे. सदर व्याख्यानासाठी कोणताही वेगळा खर्च या कार्यालयाकडून करण्यांत आलेला नाही. |
| २ | १३-०४-२०२२ | महिला रुग्णालय, बारामती, पुणे येथील रुग्णालयात स्वच्छता अभियान घेण्यांत आले आहे. यामध्ये या महाविद्यालय/रुग्णालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी (सेवा वर्ग) यांनी भाग घेतला आहे. सदर स्वच्छता अभियानासाठी कोणताही वेगळा खर्च या कार्यालयाकडून करण्यांत आलेला नाही. |
| ३ | ०२-०५-२०२२ | शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती, पुणे करीता तात्पुरत्या स्वरुपात शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु. ता.बारामती, जि.पुणे यांची जागा/इमारत भाडेतत्वावर घेण्यांत आलेली आहे. सदर ठिकाणी या महाविद्यालय/रुग्णालयामार्फत वृक्षारोपनाचा कार्यक्रम आयोजित करण्यांत आला होता. या अंतर्गत जवळपास २०० आयुर्वेद वनस्पतींची लागवड करण्यांत आलेली आहे. सदर वृक्षारोपनाचे कार्यक्रमासाठी जवळपास रु. ६,२००/- (अक्षरी रुपये सहा हजार दोनशे फक्त) इतका खर्च करण्यांत आलेला आहे. |

कृ.मा.प.....

ब) जुन-२०२२ ते ऑगस्ट-२०२३ या कालावधीत आयोजित करावयाचे कार्यक्रम खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | दिनांक | आयोजित करावयाचे कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | २१.०६.२०२२ | जागतिक योग दिन अंतर्गत योग प्रशिक्षण शिबीर. |
| २ | १२.०७.२०२२ | पावसाळयात होणारे आजार व आजार टाळण्यांसाठी घ्यावयाची काळजी. |
| ३ | १०.०८.२०२२ | महिलांमध्ये होणारे आजार व आजार टाळण्यांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना. |
| ४ | १४.०९.२०२२ | बालरोगनिदान व चिकित्सा शिबीर. बाळाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी योग्य आहारासंबंधीची माहिती व्याख्यान. |
| ५ | २७.१०.२०२२ | व्याख्यान (स्थुलता/ओबेसिटी) |
| ६ | २३.११.२०२२ | रक्तमोक्षण शिबीर. |
| ७ | २१.१२.२०२२ | त्वचारोगनिदान शिबीर. |
| ८ | ११.०१.२०२३ | स्वच्छता अभियान. |
| ९ | ०८.०२.२०२३ | मधुमेह निदान व चिकित्सा शिबीर. |
| १० | ०८.०३.२०२३ | आरोग्य विषयक व्याख्यान. |
| ११ | २६.०४.२०२३ | मोफत रक्त व लघवी तपासणी शिबीर. |
| १२ | १०.०५.२०२३ | वातव्याधी निदान व चिकित्सा शिबीर. |
| १३ | १४.०६.२०२३ | अर्शरोग निदान व चिकित्सा शिबीर. |
| १४ | २८.०६.२०२३ | सर्व रोगनिदान शिबीर. |
| १५ | २६.०७.२०२३ | व्याख्यान (स्त्रीयांमध्ये उद्‌भवणा-या कॅन्सर आजाराची लक्षणे व आजार टाळण्यांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना.) |
| १६ | १५.०८.२०२३ | आरोग्य विषयक व्याख्यान. |

आपला विश्वासु,

(वैद्य र.सा.धिमधिमे,)

प्रभारी अधिष्ठाता,

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालय,

बारामती, पुणे.